CMYK

मेहकर,लोणार तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची आमदार रायमुलकर यांनी केली पाहणी >> पान 2

सर्व निकष बाजूला ठेवून मदत देईन... >> पान 2
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांचा शब्द

राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन घेऊन शेतकरी लढ्याची ज्योत पेटली >> पान 4

**सुविचार**

दुसऱ्याला सुख मिळत असेल तर आपण थोडे दुःख सहन करायला काय हरकत आहे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



EWS, SEBC आणि OBC प्रवर्गातील मुलींना मिळणार आता मोफत आरोग्य शिक्षण

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 29 ■ गुरूवार, दि. 05 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# महिला सक्षमीकरणाचा महाराष्ट्र नवा आदर्श - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून 'मुख्यमंत्री - लाडकी बहीण योजने'तील लाभार्थ्यांना लाभाचे वाटप

## उदगीर येथे हजारो महिलांच्या उपस्थितीत सक्षमीकरण आनंद मेळावा संपन्न









दैनिक आपला विदर्भ

**उदगीर/ प्रतिनिधी** : राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्यासह अनेक महनीय महिलांनी महाराष्ट्रात सामाजिक प्रगतीचा पाया घातला आहे. शासनाने आता महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावले उचलून त्यांच्या स्वावलंबन, निर्णय शक्तीत वाढ केली आहे. महाराष्ट्राने महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सुरु असलेल्या आर्थिक विकासाच्या निर्णयाचे कौतुक केले.

उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण' योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि शासन आपल्या दारी योजना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्राच्या दैदिप्यमान इतिहासाचे कौतुक करत महिला सक्षमीकरणाला राज्य शासन चालना देत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

### 'मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण' योजना सुरुच राहील - मुख्यमंत्री

राष्ट्रपतींच्या जीवनातील संघर्ष हा सर्वसामान्य महिलांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी केलेल्या संघर्षामुळेच आज त्या देशाच्या सर्वोच्च पदी विराजमान झाल्या आहेत. या ठिकाणी उपस्थित महिलांना राष्ट्रपती महोदयांच्या यशाचे कौतुक असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम राहणार असल्याचे स्पष्ट करत राज्य शासनाने केंद्र शासनाच्या लखपती दिदी योजनेसह मुख्यमंत्री लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्यक्रम योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुलींसाठी उच्च शिक्षण मोफत योजना, अन्नपूर्णा योजना, शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी योजना यासह महिलांच्या सशक्तीकरणावर भर असलेल्या योजनांमुळे शासन सकारात्मक दिशेने वाटचाल करत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, ती पुढेही चालूच राहणार आहे. माझी एकही बहीण या योजनेपासून वंचित राहणार नाही आणि माता भगिनींचा आशिर्वाद कायम राहिल्यास दीड हजाराची रक्कम वाढविली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. तर विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्राम विकास आणि पंचायतराज, पर्यटन मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांचीही उपस्थिती होती.

उदगीर येथील विश्र्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण आणि हजारोंच्या संख्येने उपस्थित महिलांशी संवाद साधायला मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण' योजनांसह महिलांच्या अन्य योजनांची माहिती घेतली. याशिवाय राज्यात लखपती दिदी योजनेला मिळत असलेल्या प्रतिसादाचाही आढावा घेतला. या योजनांचे दृष्य परिणाम दिसत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

प्रत्येक कुटुंबात उदरनिर्वाह चालविण्यासाठी महिलांची मुख्य भूमिका असते. त्यामुळे महिलांनी आता राजकीय क्षेत्रातही पुढे येत देशाचे नेतृत्व करावे, असे आवाहनही त्यांनी केले. पुरुषांनी आता महिलांच्या क्षमतेला ओळखून त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी पाठबळ द्यावे. तसेच आमच्या संस्कृतीत महिलांचा सन्मान करणे पुरुषार्थ मानला जातो. प्रत्येक कुटुंबामध्ये हा सन्मान दिसून आला पाहिजे. महिलांनी सर्व आघाड्यांवर अग्रेसर राहताना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, असेही त्या म्हणाल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश आर्थिक महासत्ता बनण्याकडे अग्रेसर असून, अकराव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर झेप घेतली आहे. महाराष्ट्र देशाच्या प्रगतीत कायम आघाडीचे राज्य राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे सामान्य कुटुंबातील एक संघर्षशील महिला आपल्यापुढे राष्ट्रपती म्हणून विराजमान आहेत. तर मागास वर्गीयाचे प्रतिनिधीत्व नरेंद्र मोदी हे देशाचे प्रधानमंत्री आहेत. त्यामुळे संविधान बदलाच्या अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते उदगीर येथे 'शासन आपल्या दारी' या पुस्तकाचे विमोचन झाले आणि त्याची पहिली प्रत राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना भेट देण्यात आली. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू आणि राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते महिलांना लाभवाटप करण्यात आले.

### संविधान बदलू शकणार नाही - आठवले

राज्य, देशाच्या विकासासाठी आणि संविधान मजबूत करण्यासाठी सर्वजण प्रयत्नरत असून, कोणीही देशाचे संविधान बदलू शकत नसल्याचा विश्र्वास केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. तसेच राज्याची विकासाची गाडी पुढे नेताना महिलांना आर्थिक ताकद देत त्यांनाही विकास प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

### सक्षमीकरणात महाराष्ट्र प्रथम - आदिती तटकरे

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात १ कोटी ६० लाखांपेक्षा जास्त महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला आहे. लवकरच अडीच कोटींवर महिलांना लाभ मिळेल, असे महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांनी सांगितले.

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या या योजनेतून राज्यातील महिलांच्या विकासात मोठा बदल घडून येणार असून, महिलांच्या विकासात कोणतीही कसर राहणार नाही. महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे काम राज्य शासनाने केले आहे. राज्यात बालकांच्या नावापुढे आईचे नाव लावणारे हे देशातील पहिले राज्य असल्याचे त्यांनी सांगितले.

### घटनारक्षण प्रथम कर्तव्य - देवेंद्र फडणवीस

जगातील सर्वात उत्तम संविधान हे भारताचे असून, ते कोणीही बदलू शकणार नाही, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, केंद्र व राज्य शासन संविधानानुसारच काम करत आहे. केंद्र शासनाच्या नेतृत्वात राज्य शासनाने केंद्र शासनाकडून चैत्यभूमीची जागा परत घेतली आहे. तसेच लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घर लिलावात विकत घेतले आहे. शिवाय जपानमधील कोयासन विद्यापिठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारला असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पानुसार २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवायचे आहे. या विकास प्रक्रियेत महिलांचाही तेवढाच महत्त्वपूर्ण सहभाग राहणार असल्यामुळे केंद्र व राज्य शासन पुरस्कृत महिला सक्षमीकरणाच्या विविध योजनांचा त्यांनी उल्लेख केला. या योजना बंद पडणार नाहीत, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

### जिल्हा व मेडिकल द्या - संजय बनसोडे

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे म्हणाले, बुद्धाच्या शांततेच्या विचार मार्गावरूनच जगाला पुढे जावे लागणार आहे. उदगीरातील धार्मिक, ऐतिहासिक स्थळातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला जातो. 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण' योजनेतून पुरोगामी महाराष्ट्रात नवा प्रकाशमार्ग निर्माण केला आहे.

यावेळी त्यांनी उदगीर शहराच्या विकासकामांची उपस्थितांना माहिती दिली. उदगीरमध्ये जिल्ह्याची क्षमता असून, उदगीरची जिल्हा निर्मिती करावी तसेच येथे वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरी द्यावी, अशी मागणी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी केली.

# रखडलेले पुनर्वसन प्रकल्प पूर्ण करून झोपडपट्टी मुक्त मुंबई करण्याचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबई** : मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन व इतर पुनर्वसन प्रकल्प रखडल्यामुळे मुंबईकर मुंबई बाहेर गेला आहे. त्यांना परत मुंबईत आणण्यासाठी रखडलेले प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला चालना देण्यात आली असून हे प्रकल्प पूर्ण करून झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

चांदीवली येथील मिठी नदी शेजारील व विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील क्रांतीनगर व संदेश नगर येथील प्रकल्प बाधित झोपडपट्टीधारकांचे एचडीएल संकुल, कुर्ला येथे बांधलेल्या इमारतीत पुनर्वसनासाठी दिलेल्या सदनिकेच्या चाव्या वाटपाचा कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते




झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार दिलीप लांडे,अशोक माटेकर, किरण लांडे, शैलेश निंबाळकर, बाबू पुराणिक आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रकल्प बाधित झोपडपट्टीधारकांना प्रातिनिधिक स्वरूपात सदनिकांच्या चाव्याचे वाटप करण्यात आले. यावेळी 'मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिला भगिनींनी मुख्यमंत्री महोदयांचा सत्कार केला.

श्री शिंदे म्हणाले की, मुंबईतील रखडलेले प्रकल्प सुरू करण्याच्या सूचना म्हाडा, एसआरए, एमएमआरडीए, महापालिका यांना दिले आहेत. पहिल्या टप्प्यात २ लाख घरांचे उद्दिष्ट ठेवले आहे. ही घरे दर्जेदार व्हावीत अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री शिंदे म्हणाले की, चांदीवलीतील प्रकल्प बाधित झोपडपट्टी धारकांना आज ४०० घरांच्या चाव्या देण्यात येत आहेत. हे सरकार सर्वसामान्यांच्या हितासाठी निर्णय घेणारे हे सरकार आहे. त्यामुळे विकास कामाबरोबरच कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या शासनाने गेल्या दोन वर्षात विकास आणि कल्याण यांची सांगड घालण्याचे काम केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची मुदत वाढवली आहे. पुढील काळात १५०० रुपयाची रक्कम वाढविण्यात येईल. या बरोबरच महिलांसाठी अन्नपूर्णा योजनेत तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणार आहेत. तरुणांसाठी युवा कौशल्य प्रशिक्षण योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री व मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना सुरू केल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज मिळावी म्हणून मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेत पाच लाखापर्यंत चे मोफत उपचार देण्यात येत आहे. सर्वसामान्यांचे आयुष्यात चांगले दिवस यावेत म्हणून या कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर म्हणाले की, मिठी नदीच्या किनाऱ्यावरील झोपडपट्टी धारकांना चांगले घर मिळावे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ८५ कोटी रुपये देऊन आमदार दिलीप लांडे यांच्या पुढाकारातून क्रांती नगर व संदेश नगर येथील प्रकल्पग्रस्तांच्या सदनिका दुरुस्ती करून दिल्या आहेत. आपल्या तरुणांसाठी राज्य शासनाने जर्मनी बरोबर करार केले आहे. त्यानुसार वर्षभरात सुमारे ३० लाख युवकांना जर्मनीमध्ये रोजगार मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तरुणांनी नाव नोंदणी करावे.

आमदार श्री. लांडे यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती दिली. प्रकल्प बधितांच्या सदनिकांसाठी ८५ कोटी रुपये उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. लांडे यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचे आभार मानले.

# तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतले दर्शन





दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/ प्रतिनिधी** : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथे गुरुग्रंथ साहिब यांचे दर्शन घेतले. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनीही गुरुग्रंथ साहिब यांचे दर्शन घेतले.

तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा बोर्डाच्यावतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा पारंपारिक पद्धतीने शाल, श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रपती महोदयांच्या कन्या इतीश्री याही उपस्थित होत्या. त्यांचाही यावेळी गुरुद्वारा बोर्डाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सचखंड गुरुद्वाराचे प्रशासक डॉ. विजय सतबिरसिंगजी, सल्लागार जसवंतसिंग बॉबी, अधिक्षक राज देविंदरसिंगजी, पुजारी बाबा ज्योतिदरसिंगजी जत्थेदार, संत बाबा बलविंदरसिंगजी आदी उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुद्वारा येथील दर्शनानंतर तेथे असलेल्या लंगरला भेट देवून पाहणी केली व समाधान व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान स्वनिधी योजनेचे लाभार्थी कटलरी व किचन्स, खेळणी व्यवसायिक केतन लक्ष्मण कळसकर व फळे आणि ज्यूस व्यावसायिक समशेरसिंग लालसिंग राठोड यांच्या स्टॉलला भेट देवून त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

## शिक्षक दिन!

आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील. आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्र्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# मेहकर,लोणार तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची आमदार रायमुलकर यांनी केली पाहणी, सर्वेक्षण करण्याच्या दिल्या सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/ प्रतिनिधी** : ता.१ सप्टेंबर रोजी मेहकर तालुक्यातील देऊळगाव साकरशा, पारखेड, पाथर्डी लोणार तालुक्यातील रायगाव, सावरगाव मुंढे, नांद्रा आधी गावांच्या परिसरात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाल्याने आज आमदार संजय रायमुलकर यांनी अधिकाऱ्यांसह नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. नुकसानीचे सर्वेक्षण, पंचनामे करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

ता.१ सप्टेंबर रोजी मेहकर लोणार दोन्ही तालुक्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात पाऊस झाला. परंतु मेहकर तालुक्यातील देऊळगाव साखरशा , पारखेड, पाथर्डी आणि लोणार तालुक्यातील रायगाव, सावरगाव मुंडे, गोत्रा, नांद्रा आधी गावांच्या परिसरात अतिवृष्टी झाल्यामुळे सोयाबीन कपाशी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांची पडझड झाली. झाडे उन्मळून पडली. शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिल्यामुळे पिके सडण्यास सुरुवात झाली आहे.





सदर नुकसानीची माहिती प्राप्त होताच आज सकाळी आमदार संजय रायमुलकर यांनी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, लोणारचे तहसीलदार भूषण पाटील, गटविकास अधिकारी देशमुख, तालुका कृषी अधिकारी कावरखे यांच्यासह लोणार तालुक्यातील रायगाव ,सावरगाव मुंडे, नांद्रा, गोत्रा आधी भागांची व पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांना धीर दिला व नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करत आहे असे आमदार रायमुलकर यांनी सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी, तालुकाप्रमुख भगवानराव सुलताने, शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, नंदू भाऊ मापारी, भगवानराव कोकाटे, अशोक वारे जितेंद्र घुले ,जितेंद्र सानप, डॉ. काशिनाथ घुगे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. सरपंच रामराव नागरे, उत्तमराव सानप, बंडू नागरे, स्वप्नील घुले ,संदीप नागरे ,गजानन नागरे, प्रभु नागरे, ज्ञानेश्र्वर नागरे, संतोष डाखोळकर, माधवराव थोरवे, उत्तमराव नागरे, केशव नागरे, शिवनारायण नागरे, गणेश नागरे, सावरगाव मुंढे येथील नामदेवराव नागरे, विठ्ठलराव नागरे ,सरपंच गणेश मुंडे ,गोविंदराव मुंडे, सुनील जायभाये यांनी नुकसानीची माहिती आमदार रायमुलकर आणि अधिकाऱ्यांना दिली. ग्रामसेवक, तलाठी व कृषी सेवक यांनी पिकांच्या नुकसानीचे सर्वेक्षण करून तातडीने पंचनामे करावेत, अशा सूचना रायमुलकर यांनी दिल्या.

मेहकर तालुक्यातील पारखेड, देऊळगाव साकरशा भागातील नुकसानीची पाहणी ही आमदार संजय रामुलकर यांनी अधिकाऱ्यांसोबत केली. आणि नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे करण्याचे आदेश दिले.मेहकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभपती माधवराव जाधव,उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तालुका कृषी अधिकारी किशोर काळे, तहसीलदार निलेश मडके, गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे आदी यावेळी उपस्थित होते.

# जगाचा 'हॅपीनेस इंडेक्स' वाढवण्याची कलावंतांमध्ये ताकद – सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : जगभरात आर्थिक क्षमता, विविध क्षेत्रातील प्रगती यावरून 'ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स' काढण्यात येतो. मात्र तरीही चिंता, समस्या आहेतच. त्यामुळे जगात आता या इंडेक्स ऐवजी 'हॅपिनेक्स इंडेक्स' महत्त्वाचा आहे. हा इंडेक्स वाढविण्याची ताकद केवळ कलावंतांमध्येच आहे,असे गौरवोद्गार सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्रदान सोहळ्यात काढले.

सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने देण्यात येणारे ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार आणि राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्रदान समारंभ आज यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाला. कार्यक्रमात मंत्री श्री. मुनगुंटीवार बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे, गोरेगाव चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, सर्व कलावंत आणि त्यांची कला ही अनेक पिढ्यांचे समाधान करत आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीला सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम या कलावंतांनी केले आहे.



### पर्यावरण व शाश्वत विकासासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रयत्नांची जागतिक पातळीवर दखल
### राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचे मुंबईत थाटात वितरण

उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार देण्याची प्रथा, परंपरा आहे. आपला देश संस्कृतीप्रधान आहे, एखाद्याच्या योगदानाचं मनापासून कौतुक करणं, त्याला दाद देणं यासाठी विशाल हृदय लागतं. महाराष्ट्र शासनाने ही सहृदयता जपली आहे. आपल्या मराठी माणसाचं आपण कौतुक करणं यापेक्षा मोठा आनंद नाही. प्रत्येक व्यक्तीच्या चांगल्या कामासाठी मान्यता आणि कृतज्ञता दर्शविणारा हा सोहळा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

अभिनय, लेखन, किर्तन, प्रवचन, नृत्य, दिग्दर्शन या विविधांगी कलांनी आपला महाराष्ट्र नटलेला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाला ऐतिहासिक आणि गौरवशाली परंपरा आहे.समर्पित भावनेने काम करणाऱ्या वृद्ध कलावंतांना राज्य शासन मदत करते त्यासाठी असणारी वयोमर्यादा आपण ५० वर्ष इतकी ठेवली. ही वयोमर्यादा ठेवणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या वृध्द कलावंतांचा सन्मान निधी सरसकट पाच हजार रुपये करण्यात आला आहे, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, राज्यात ७५ चित्र नाट्य मंदिर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिरात बदल करण्यात येत आहे. राज्यामध्ये चित्रपटांना चित्रीकरणासाठीची लागणारी परवानगी एक खिडकी योजनेअंतर्गत देण्यात येत आहे. तसेच बालनाट्य सृष्टीच्या विस्तारीकरणासाठी सरकार कार्य करीत आहे. त्यासाठी येणाऱ्या सूचनांचे स्वागत करून त्याची यथोचित अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यावेळी प्रधान सचिव श्री. खारगे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कला संस्कृतीच जतन आणि संवर्धन करणाऱ्यांचा हा सन्मान आहे. विविध परंपरेने, संस्कृतीने नटलेला असा हा आपला महाराष्ट्र आहे. कलाकारांमुळे ही संस्कृती टिकली आहे. कलांवतांचा संपूर्ण मदत करण्याचे काम शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे. पुरस्कारासाठीची रक्कम दुप्पट व तिप्पट करण्यात आली आहे.

यावेळी मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते विविध पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, मानपत्र आणि रकमेचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

सन २०२४ साठीचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार ह. भ. प. संजय महाराज पाचपोर यांना, भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार सन २०२४ आरती अंकलीकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार सन २०२४ ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश बुध्दीसागर, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार सन २०२४ शुभदा दादरकर, तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार सन २०२३ चा शशिकला झुंबर सुक्रे यांना घरी जाऊन नंतर देण्यात येणार आहे. तर सन २०२४ पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना प्रदान करण्यात आला.

तसेच २०२४ साठीचे राज्य सांस्कृतिक पुरस्कारही या समारंभात प्रदान करण्यात आले. राज्य सांस्कृतिक पुरस्कार मानकऱ्यांमध्ये विशाखा सुभेदार (नाटक), डॉ. विकास कशाळकर (उपशास्त्रीय संगीत), अभिमन्यू धर्माजी सावदेकर (लोककला), शाहीर राजेंद्र कांबळे (शाहिरी), सोनिया परचुरे (नृत्य), संजय नाना धोंडगे (किर्तन /समाजप्रबोधन), पांडुरंग मुखडे (वाद्यसंगीत), नागेश सुर्वे (कलादान), कैलास मारुती सावंत (तमाशा) आणि शिवराम शंकर घुटे (आदिवासी गिरीजन) यांना गौरवण्यात आले.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या कलाविष्काराचे सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमात अजित परब, संज्योती जगदाळे, केतकी भावे – जोशी, अरुण कदम, श्याम राजपूत, भार्गवी चिरमुले, विकास पाटील, शाहीर शुभम विभुते यांच्यामार्फत सादरीकरण झाले.

## आधी धडक दिली, नंतर डिव्हायडरपर्यंत फरफटलं; मुंबईत पुन्हा एकदा आलिशान गाडीनं महिलेला चिरडलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईत पुन्हा एकदा एका महागड्या कारनं एका निष्पाप महिलेचा जीव घेतल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. महागड्या गाडीनं महिलेला चिरडल्यामुळे झालेल्या अपघातानं मालाड हादरलं आहे. दुर्दैवी बाब म्हणजे, एका निष्पाप महिलेचा या अपघातात हकनाक बळी गेला आहे. भरधाव गाडीनं महिलेला धडक दिली, त्यानंतर तसंच तिला डिव्हायडरपर्यंत फरफटत नेलं. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली आहे. काही दिवसांपूर्वी वरळी हिट अँड रन अपघातानं मुंबई पुरती हादरून गेली होती. बड्या बापाच्या लेकानं आपल्या महागड्या कारनं एका महिलेला फरफटलं होतं, यामध्ये महिलेचा मृत्यू झाला होता. असाच काहीसा प्रकार मालाडमध्येही घडला आहे. भर वर्दळीच्या रस्त्यावर घडलेल्या अपघातामुळे एकच खळबळ माजली आहे.




# सर्व निकष बाजूला ठेवून मदत देईन... नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांचा शब्द

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्यात २ सप्टेंबर रोजी ३२ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले.

यावेळी त्यांनी उदगीर तालुक्यातील हेर आणि लोहारा शिवारातील पिक नुकसानीची पाहणी केली, तसेच शेतकऱ्यांकडून नुकसानीची माहिती घेतली.

शेतकऱ्यांना एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून जास्तीत जास्त नुकसान भरपाई दिली जाईल. राज्य शासन सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून यावेळी झालेल्या नुकसानीच्या काळातही शेतकऱ्यांना पूर्ण ताकदीने मदत केली जाईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. तसेच अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेगाने करून शेतकऱ्यांना लवकरात नुसकान भरपाई देण्यात येईल, असे आश्र्वासन फडणवीस यांनी दिले.





केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्यासह माजी आमदार गोविंद केंद्रे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाला उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस हे लातूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. हा समारंभ झाल्यानंतर अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी दोघेही थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले.

२ सप्टेंबर रोजी उदगीर, जळकोट तालुक्यातील सर्व महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने सोयाबीन व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना तातडीने नुकसान भरपाईबाबत आश्वस्त केले.

मराठवाड्यात अतिवृष्टी झाल्यानंतर लगेचच विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लातूर जिल्ह्यातही अतिवृष्टीने सोयाबीनसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आज प्रत्यक्ष पाहणीमध्ये दिसून आले. सोयाबीन पिकामध्ये अजूनही पाणी साचलेले दिसत आहे. यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्यात येईल. शेतकऱ्यांना मदत करताना नियम, निकष न पाहता एनडीआरएफच्या निकषापेक्षा जास्त नुकसान भरपाई देण्यात येईल. संकट काळात सरकार नेहमी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. यावेळीही शेतकऱ्यांच्या मागे सरकार पूर्ण ताकदीने उभे राहील, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकऱ्यांना दिला.

अतिवृष्टीमुळे सोयाबीनसह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांना लवकरात लवकर देण्यात येईल. पंचनाम्याचे अहवाल येताच नुकसानभरपाईबाबत पुढील कार्यवाही तातडीने केली जाईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# EWS,SEBC आणि OBC प्रवर्गातील मुलींना मिळणार आता मोफत आरोग्य शिक्षण

## मुलींना आरोग्य शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा हा निर्णय : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : आरोग्य विज्ञानाच्या व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल (EWS ) सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग ( SEBC ) आणि मागासवर्ग(OBC) प्रवर्गातील मुलींना आता मोफत शिक्षण मिळणार आहे शासनाचा हा निर्णय या समाजातील मुलींना आरोग्य शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देणारा ठरणार आहे अशी प्रतिक्रिया केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे.

आरोग्य विज्ञान व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक एथड सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास डएइउ वर्ग तसेच इतर मागासवर्ग जइउ या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कात पूर्वी ५० टक्के लाभ देण्यात येत होते परंतु ३० ऑगस्ट २०२४ ला महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्यावतीने नवीन शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे यामध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या आरोग्य विज्ञान व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल , सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग तसेच इतर मागासवर्ग या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५०% सवलती ऐवजी १००% लाभ मंजूर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे त्यामुळे राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ,शासन अनुदानित वैद्यकीय महाविद्यालय , महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय ,खाजगी विनाअनुदानित शासकीय महाविद्यालय या महाविद्यालयामधील आरोग्य विज्ञानच्या व्यवसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी आहेत अशा व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे . राज्य सरकारच्या वतीने आर्थिक दृष्ट्या दुर्बल सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास आणि इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थिनीसाठी घेतलेला हा निर्णय मुलींना आरोग्य शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा ठरणार आहे राज्यातील महायुतीचे सरकार गोरगरीब जनतेच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे या शासन निर्णयातून दिसून येत असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय आयुष , आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या शासन निर्णयावर व्यक्त केली आहे ..

## पालखी मार्गाच्या कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : शेगाव पंढरपूर पालखी मार्गाला जागजागी तडे गेले असून काम नित्कृष्ट दर्जाचे झाले आहे.अनेक अनुषंगिक कामेही करण्यात आलेली नाहीत.त्यामुळे ता.३ रोजी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत अजिसपूर ते मेहकर पट्ट्यातील कामाची कंत्राटदार श्रीहरी कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याचा व कंपनीच्या अनामत रकमेतून रस्त्याची उर्वरित कामे पूर्ण करण्याचा निर्णय मंत्री दादा भुसे यांनी घेतला.

जिसपुर,लोणार,सुलतानपूर ते मेहकर या पालखी मार्गाचे काम नित्कृष्ट दर्जाचे झाल्याने कारवाई आणि रस्त्याची उर्वरित अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मागणी आमदार संजय रायमुलकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली होती. या विषयावर चर्चा करून निर्णय घे ण्यासाठी मंत्रालयात २० ऑगस्ट रोजी बैठक आयोजित केली होती. पण काही कारणाने ही बैठक रद्द झाली. संबंधित रद्द झालेली बैठक काल तारीख ३ सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांच्या दालनात पार पडली.



यावेळी आमदार संजय रायमुलकर यांनी. बैठकीत सांगितले की , पालखी मार्गाचे सदर काम कमी गुणवत्तेचे झाले असून जागजागी तडे गेले आहेत.त्याचा सामान्य लोकांना त्रास होत आहे. रस्त्याच्या दुतर्फा पिचींग भरण्यात आली नाही.नाली बांधकाम अर्धवट झाल्याने लोकांच्या घरात पाणी जाते, शेतांमध्ये पाणी जाऊन पिकांची नासाडी होते.गावांच्या नावांचे फलक न लावणे, प्रवासी निवारे न उभारणे , गाव फाटे या ठिकाणी दुभाजक नसणे , वीज दिवे न लावणे आदी कामे करण्यात आली नाहीत. चर्चेअंती सदर कामाची कंत्राटदार श्रीहरी कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजी नगर ला काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव तयार करण्याचा आणि या कंपनीच्या अनामत



चर्चेअंती सदर कामाची कंत्राटदार श्रीहरी कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजी नगर ला काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव तयार करण्याचा आणि या कंपनीच्या अनामत रकमेतून उर्वरित कामे ,दुरुस्ती कामे करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भूसे यांनी बैठकीत जाहीर केले.

यावेळी बैठकीला अप्पर मुख्य सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक , मुख्य अभियंता आदी उपस्थित होते.

## महाविकास आघाडीतून मुख्यमंत्री पदी कोण होणार?

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : ''बदलापूरातील आंदोलनात बाहेरून लोक आणले असे सरकारचं म्हणणं आहे. बदलापूरचे आंदोलक आम्ही गोळा केले नाहीत. चीड व्यक्त करणाऱ्यांवर खटले भरणं गैर आहे. आंदोलकांवर खटले भरणं हे निंदनीय आहे, असे स्पष्ट मत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. महिला अत्याचारांमध्ये सतत वाढ होत आहे. गृहमंत्री जबाबदाऱ्यांची पूर्तता करत नाहीत, अशी टीकाही पवार यांनी केली.राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्यानंतर सत्ताधाऱ्यांवर विरोधकांनी टीका केली.

## कृषीमंत्री धनंजय मुंडेंकडून गेवराई तालुक्यातील नुकसानग्रस्त पिकांची पाहणी





दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीड जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याने शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. जोमात आलेली पिके दोन दिवसांच्या पावसाने वाया गेली आहेत. याचं नुकसानग्रस्त पिकांची पाहणी राज्याचे कृषी मंत्री आणि बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केली. यावेळी सर्वत्र पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सरसकट नुकसान भरपाई देण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे फक्त शेतकऱ्यांच्या मोटारी,ठिबक,गुरे यांची हानी झाली असेल त्यांचे पंचनामे होतील, असे कृषीमंत्री मुंडे यांनी सांगितले.पाहणी दौऱ्यावेळी आमच्यावर आत्महत्येची वेळ आली, अशी व्यस्था शेतकऱ्यांनी मुंडे यांच्या समोर मांडली. यावेळी आत्महत्या करु नका, मी आणि सरकार तुमच्या पाठीशी आहे असे धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांना सांगितले. कृषीमंत्री हे तालुक्यातील लोणावळा गावात नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करत होते. यावेळी त्यांच्या सोबत जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, महसूल,कृषी व पोलीस प्रशासन होते.

## छगन भुजबळ आणि अमृता पवार यांच्यातील वाद मुंबई दरबारी; गिरीश महाजन यांची भेट, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार

**नाशिक/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर येवला मतदारसंघात मानापमान नाट्य रंगल्याचे दिसून येत आहे. नांदूरमध्यमेश्वर ग्रामपंचायत अंतर्गत अंगणवाडी आणि आरोग्य केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी निमंत्रित केले नसल्यानं राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्रशासन आणि माजी जि. प. सदस्य अमृता पवार , सुरेखा नरेंद्र दराडे यांच्या विरोधात विधानसभा अध्यक्षांकडे तक्रार केली होती.

दरम्यान, येवला विधानसभा मतदारसंघातील हाच वाद आता मुंबईपर्यंत पोहचला आहे. अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि भाजपच्या अमृता पवार यांच्यांत विधानसभा निवडणुकीच्या आधीच राजकीय सामना सुरू झालाय. विकासकामाच्या उद्घाटन समारंभाला निमंत्रित केले नसल्याने भुजबळ यांनी हक्कभंग प्रस्ताव आणण्याची मागणी केल्यानंतर भाजपच्या अमृता पवार यांनी गिरीश महाजन यांची भेट घेतलीय. सोबतच देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही छगन भुजबळ यांची तक्रार करणार असल्याचा पवित्रा अमृता पवार यांनी घेतला आहे.

अमृता पवार भाजपच्या येवला विधानसभा प्रमुख आणि आजी जिल्हा परिषदेच्या सदस्या आहेत. त्यांच्या विकासनिधीतून झालेल्या कामाच्या लोकार्पण सोहळा वरून पवार आणि भुजबळ यांच्यांत वादाची ठिणगी पडली आहे.

## पुरात वाहुन गेलेल्या महिलेचा मृतदेह आढळला

### चान्नी येथील ग्रामस्थ व पोलिसांच्या प्रयत्नाला यश

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** पातुर तालुक्यातील चान्नी येथे विश्र्वमित्र नदीच्या पुरात महिला वाहून गेल्याची घटना, सोमवार दि.२ ऑगस्ट रोजीच्या दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडली होती,महिलेला शोधण्यासाठी चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे आपल्या ताफ्यासह व ग्रामस्थ शर्तीचे प्रयत्न करीत होते,अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून,३ ऑगस्ट रोजीच्या सकाळी चान्नी जवळ वाहुन गेलेल्या रुख्मीनाबाई दशरथ पवार यांचा मृतदेह आढळून आला, महिला चान्नी येथे विश्र्वमित्र नदीच्या काठावर कपडे धुण्यासाठी गेली असता,पाय घसरल्याने तोल पाण्यात गेला,आणि महिला पुरात वाहून गेली होती,ठाणेदार रवींद्र लांडे, पोलिस कर्मचारी सुधाकर करवते, सुदर्शन चवरे,उज्वला इटीवाले, स्वाती जाधव,यांनी मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी सर्वोपचार रुग्णालय अकोला येथे पाठविले आहे.

**'या' ग्रामस्थांनी केले शर्तीचे प्रयत्न**

चान्नी येथील संगीत बर्डे (महाराष्ट्र पोलीस), करण सोनोने(आर्मी), चंद्रकांत तायडे (मा. सरपंच) बळवंत घुगे, पवन बर्डे, मंगेश बर्डे(आर्मी),विशाल सरदार(आर्मी सुभाष घोरे(आर्मी),अजय पवार, श्रीकृष्ण ताले,संगीत घुगे, गौतम इंगळे , प्रकाश पवार,गजानन बर्डे शेषराव पवार,कैलास बर्डे, दिलीप अहिरे, विजय बर्डे राजु पवार, सचिन कांबळे, आदित्य ठोसरे,आदी ग्रामस्थ व पोलीसांनी महिलेचा मृतदेह शोधण्यास शर्तीचे प्रयत्न केले.



## संक्षिप्त...

### आदित्य ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊ नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : पाचोड पासून आदित्य ठाकरे यांनी पावसामुळे उध्वस्त झालेल्या शेतीची पाहणी केली. यावेळेस त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. कपाशी पाण्यात गेलेली आहे, शेतकऱ्यांच्या शेतात रस्त्याच पाणी गेलं, या शेतकऱ्यांच्या तक्रारी त्यांनी जाणून घेतल्या आणि याबाबत स्वतः प्रशासनाकडं पाठपुरावा करणार असल्याचं आश्र्वासन आदित्य ठाकरे यांनी दिलं. सोबतच हे सरकार निर्दयी आहे, मदत करत नाही, फक्त घोषणा करते, सरकारनं शेतकऱ्यांचे हे दुःख पहावं असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावलाय. याआधी नुकसान झाले, ती मदत देखील अजून मिळाली नाही किमान यावेळेस तरी सकारात्मकता सरकारने दाखवावी, असे आवाहन आदित्य ठाकरे यांनी सरकारला केलेले आहे. सोबतच नुकसानीची माहिती देणारा कृषी विभागाचा प बंद आहे. या ठिकाणी इंटरनेट नाही, शेतकऱ्यांना ते कळत नाही. सरकारने याबाबतही उपाययोजना करावी असे आदित्य ठाकरे म्हणाले.

### मनसेचा महापालिकेवर पाण्यासाठी हंडा मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** :नवी मुंबईतील बेलापूर मधील पारसिक हील टेकडी लगत राहुल नगर सोसायटीत मागील दोन वर्ष पिण्याच्या पाण्याची अवस्था अत्यंत बिकट आहे. तेथील रहिवासीयांनी याबाबत अनेकवेळा पालिका प्रशासनाकडे मागणी करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या सोसायटीतील रहिवासीयांना पाणी मिळावे यासाठी आज नवी मुंबई मनसेने महानगर पालिकेवर हंडा मोर्चा काढला आहे. यावेळी हा मोर्चा पालिका प्रवेश द्वारावर अडवण्यात आला. पालिका अधिकाऱ्यांनी गेटवर येऊन आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. पुढील काळात पालिकेने यावर तोडगा काढला नाही तर आम्ही मालिका कार्यालय आणि संबधित नेत्यांच्या घरी जाऊन जाब विचारू अशी प्रतिक्रिया मनसे शहर सचिवसचिनकदम यांनी दिली आहे.

### डोंबिवलीतून कोकणात जाणाऱ्यांसाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्यातर्फे मोफत बस सेवा; प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : डोंबिवलीतून गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांसाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या तर्फे मोफत बस सेवा सुरू करण्यात आली आहे. डोंबिवलीतून बस या कोकणातील रत्नागिरी, चिपळूण, सिंधुदुर्ग, मालवण, देवगड आणि इतर परिसरात बस सोडण्यात येणार आहेत. एकीकडे बस संपामुळे प्रवासी त्रस्त असताना, या मोफत बस सेवेने डोंबिवलीकरांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रवाशांनी खासदार श्रीकांत शिंदे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे यासाठी आभारमानलेआहेत.

### शेतकरी पण लाडका हे..., राज ठाकरेंची शिंदे सरकारकडे मागणी!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मराठवाड्यामध्ये मागील काही दिवसांपासून होत असलेल्या अतीवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी शेतकऱ्यांना मदत करण्याचं आवाहन राज्यामध्ये सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या सरकारला केली आहे. शेतकरी पण लाडका आहे हे सरकारने दाखवून द्यावं, असं राज यांनी म्हटलं आहे. तसेच राज ठाकरेंनी आपल्या कार्यकर्त्यांना शेतकऱ्यांना मदत करण्याचा सल्ला दिला आहे. हा सल्ला देताना त्यांनी खास आपल्या शैलीत शाब्दिक टोलेबाजी केल्याचं दिसून येत आहे. राज यांनी ट्वीटर तसेच फेसबुकवरुन पोस्ट करत आपली मागणी मांडली आहे. ''गेल्या काही दिवसांत मराठवाड्यात झालेल्या पावसाने, तिथल्या अनेक जिल्ह्यांमध्ये शेतीचं अमाप नुकसान झालं आहे. कित्येक पिकं अगदी काढणीला आलेली असताना वाहून गेली आहेत. डोळ्यासमोर उभं झालेलं पीक नष्ट होणं आणि ते देखील सणासुदीच्या तोंडावर, हे सहन करणं कठीण आहे. राज्य सरकारने तातडीने या नुकसानीचे पंचनामे करून, जितक्या लवकर नुकसान भरपाईची रक्कम देता येईल ते पहावं. शेतकरी पण लाडका आहे हे दाखवून द्यावं,'' असं राज ठाकरेंनी सोशल मीडियावरुन केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन घेऊन शेतकरी लढ्याची ज्योत पेटली

## शेतकऱ्यांच्या साथीने रविकांत तुपकरांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरूवात

## शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या लढाईत सहभागी व्हा: रविकांत तुपकरांचे आवाहन; टप्प्याटप्प्याने पेटणार आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**सिंदखेड राजा/प्रतिनिधी** : मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे राष्ट्रमाता जिजाऊंच्या चरणी नतमस्तक होऊन शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जिजाऊ राजवाडा समोर आपल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे. आज ४ सप्टेंबर रोजी रविकांत तुपकर शेतकऱ्यांसह सिंदखेडराजात पोहचले. राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन घेऊन त्यांनी आंदोलनस्थळी आपले अन्नत्याग सुरू केले. यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थित राहुन तुपकरांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यावेळी बोलतांना रविकांत तुपकर म्हणाले की, ही लढाई एकट्या रविकांत तुपकरांची नसून तमाम शेतकऱ्यांच्या न्याय हक्काची ही लढाई आहे, त्यामुळे आता नुसता पाठिंबा देऊ नका तर या आंदोलनात सहभागी व्हा, असे आवाहन त्यांनी केले. आपल्या आंदोलनाचा श्र्वास सोयाबीन – कापूस आहे. आता आपला कोणी नेता नाही त्यामुळे आपला लढा आपल्यालाच पुढे न्यावा लागणार आहे. आता सरकारला गुडघ्यावर आणल्याशिवाय आपल्याला स्वस्थ बसायचे नाही, असे सांगत हे आंदोलन टप्प्याटप्प्याने पेटणार असल्याचे रविकांत तुपकर यांनी सांगितले.

आंदोलनाला सुरुवात करण्यापूर्वी रविकांत तुपकर यांनी अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली व त्यानंतर ते सिंदखेडराजात पोहोचले. त्यांच्या पाठोपाठ मोठ्या संख्येने शेतकरी देखील येथे दाखल झाले. त्यामुळे आंदोलन स्थळाला मेळाव्याचे स्वरूप आले होते. शेतकऱ्यांशी संवाद साधताना रविकांत तुपकर पुढे म्हणाले की, हे सरकार वारंवार सांगत असते की आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालतो. त्यामुळे छत्रपती शिवरायांना घडवणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानासमोर हे आंदोलन करीत आहोत, या सरकारला सद्बुद्धी दे अशी प्रार्थना राष्ट्रमाता जिजाऊंच्या चरणी केली असून सोयाबीन–कापसाच्या आंदोलनाचे केंद्र आता सिंदखेडराजा करायचे आहे, असे रविकांत तुपकरांनी स्पष्ट केले. सोयाबीन–कापूस तसेच पिकविमा, शेतकरी, पिकविमा, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची १००% नुकसान भरपाई, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती यासह शेतकऱ्यांच्या न्यायहक्काच्या मागण्यांसाठी हे आंदोलन केले जात आहे. त्यामुळे या आंदोलनाचा राजकीय अर्थ लावू नका. जोपर्यंत आंदोलन संपत नाही तोपर्यंत मी राजकीय भाष्य करणार नाही, असेही तुपकरांनी सांगितले. अंबानी –अदानीचे कर्ज माफ करायला सरकार जवळ पैसा आहे, मात्र शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायला पैसा नाही का..? असा सवाल यावेळी रविकांत तुपकर यांनी केला. शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविमा अद्याप जमा झाला नाही नेते तारखावर तारखा देत आहेत, ३१ ऑगस्ट पर्यंत पिकविम्याची रक्कम जमा होईल असे नेते सांगत होते. तोपर्यंत आपण वाट पहिली मात्र आता आपली सहनशीलता संपली आहे त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी जिजाऊंचे दर्शन घेऊन आंदोलनाला सुरुवात केली असल्याचे रविकांत तुपकर यांनी सांगितले. ही लढाई माझी एकट्याची नसून सर्व शेतकऱ्यांचा हा लढा आहे त्यामुळे सर्वांना या आंदोलनात सहभागी व्हावे लागणार आहे. शेतकऱ्यांची एकजूट सरकारला झुकायला भाग पडेल, असा विश्र्वास व्यक्त करत रविकांत तुपकर यांनी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. हे आंदोलन टप्प्याटप्प्याने पुढे नेणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. सिंदखेडराजा येथे आंदोलन सुरू असले तरी या आंदोलनाची धग राज्यभर पोहोचणार आहे आणि राज्यभरात विविध ठिकाणी वेगवेगळी आंदोलने केली जाणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. ५ सप्टेंबर रोजी सर्व शेतकरी व कार्यकर्ते जिल्हाधिकारी ,तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देतील.








### तर समृद्धीवर बैलगाड्या घेऊन चक्काजाम करणार

आजपासून रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात झाली आहे तर उद्या पाच सप्टेंबर पासून वेगवेगळे आंदोलने होणार आहे. उद्या,५ सप्टेंबरला शेतकरी आपापल्या भागातील तहसीलदार व जिल्हापातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन देणार आहे. ६ सप्टेंबरला गावागावात प्रभारतफेरी निघेल. ७ सप्टेंबरला ग्रामपंचायतचे ठराव घ्यावे,असे आवाहनही तुपकर यांनी केले आहे. ८ सप्टेंबरला रविवारी सगळीकडे चक्काजाम आंदोलन करण्यात येईल. समृध्दी महामार्ग देखील अडवू, समृध्दी महामार्गावर बैलगाड्या घेऊन घुसू असा इशारा तुपकर यांनी दिला आहे.

### सपोर्ट फॉर फार्मर

गावगाड्यातील व खेड्यापाड्यातील शेतकरी– शेतमजुरांनी शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला समर्थन दिले पाहिजे. तसेच शहरी भागातील नागरिकांनी देखील शेतकऱ्यांच्या लढाईला समर्थन देणे गरजेचे आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ व्यक्तींपर्यंत ज्यांना जसं जमेल त्या पद्धतीने या आंदोलनाला पाठिंबा व समर्थन द्या, व्हिडिओ करा आणि सोशल मीडियावर ते व्हायरल करा, सपोर्ट फॉर फार्मर अशी एक सोशल मीडियावर, राबवा असे आवाहन देखील रविकांत तुपकर यांनी केले आहे.

विद्यमान सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्र्नाकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना शेतकऱ्यांच्या प्रश्र्नासाठी अन्नत्यासारखे गंभीर स्वरूपाचे आंदोलन करावे लागत आहेत. लोकसभा व विधानसभेमध्ये एकही लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांचे पाहिजे तसे प्रश्र्न मांडताना दिसत नाही शेतकऱ्याचे प्रश्र्न मांडण्याचे वारंवार काम हे शेतकरी नेते रविकांत तुपकरच करतात. त्यामुळे सर्व जनतेला आव्हान आहे की या आंदोलनाला मोठ्या संख्येने पाठिंबा देऊन आपले प्रश्र्न तात्काळ रविकांत दादा तुपकर यांच्या मार्गदर्शनात मार्गी लावावे डॉक्टर सौ ऋतुजा चव्हाण यांनी केले आव्हान

६ सप्टेंबरला महाराष्ट्रातल्या गावागावात प्रभातफेऱ्या निघतील. ७ सप्टेंबरला गावागावात ग्रामपंचायतचे ठराव घेतल्या जाणार आहे, तर ८ सप्टेंबरला महाराष्ट्रभर चक्काजाम आंदोलन करणार असल्याची घोषणा यावेळी रविकांत तुपकर यांनी केली.

## वृत्तविशेष...

### नागपूर विमानतळावर ६१ लाखांचे सोने जप्त; दोघांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : शहरातील आंतरराष्ट्रीय विमानतळावर कस्टम विभाग आणि एअर इंटेलिजन्स यूनिटच्या टीमने मोठी कारवाई केली आहे. दोन प्रवाशांकडून विभागाने ६१ लाखांचे सोने जप्त केले आहे.



माहितीनुसार, गुप्त माहितीच्या आधारे संशयित प्रवाशाची तपासणी केली असता २ ट्रॉली बॅगमध्ये सोने चांदीच्या रंगाच्या जाड तारांच्या स्वरूपात लपवून ठेवलेले आढळून आले. वायरच्या स्वरूपात असलेल्या सोन्याला चांदीचा लेप दिला होता.

या कारवाईत ८५८.३३ ग्रॅम सोने पकडण्यात आले. या सोन्याची एकूण किंमत जवळपास ६१,२५,५४९ रूपये इतकी आहे. कतार एअरवेजने (फ्लाइट क्र. क्यूआर–५९०) दोहाहून नागपूरला जात असलेल्या दोन प्रवाशांकडून सोने जप्त केले आहे. या दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून कस्टम विभागाने पुढील तपास सुरु केला.

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शिव जनस्वराज्य यात्रेला शेगावातून सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : कापूस–सोयाबीन भाववाढ, कर्जमाफी व पिकविमा यांसह विविध प्रश्र्नांवर स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांच्या नेतृत्वात आजपासून श्री क्षेत्र नागझरी येथून शिव जनस्वराज्य यात्रेचा प्रारंभ करण्यात आला आहे. ही यात्रा १६ दिवसांमध्ये जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघातील १९१ गावांचा दौरा करून शेतकऱ्यांची जनजागृती करणार आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून या यात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. ही यात्रा १९१ गावांचा दौरा करून नंतर माजी खासदार राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी संग्रामपूर तहसिलच्या मैदानावर धडकणार आहे. सोयाबीन भाववाढ कर्जमाफी व पिकविमा सह विविध प्रश्र्नांवर सरकारने निर्णायक भूमिका घ्यावी अशी मागणी या यात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

### गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढोल ताशांच्या विक्रीत विक्रमी वाढ



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी** :गणपती उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. नंदुरबार जिल्हा हा गणपती उत्सवासाठी सर्वदूर प्रसिद्ध आहे. नंदुरबार शहरातील गणेश मूर्तींना ज्याप्रकारे गुजरात मध्य प्रदेश तसेच महाराष्ट्राच्या इतर भागातुन मागणी आहे. त्याचप्रमाणे नंदुरबारच्या ढोल–ताशांनाही सर्व दूर मागणी आहे. नंदुरबारची वाजंत्री संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. ढोल ताशांच्या आवाज कानावर पडताच गणेश भक्तांचे पाय थिरकायला लागतात. गणेशोत्सव आता दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे त्यामुळे ढोल ताशांच्या दुकानावर देखील मोठ्या प्रमाणात मंडळांची गर्दी होताना दिसत आहे. ढोल ताशे घेण्यासाठी नागरिकांनी दुकानावर गर्दी केलेली दिसून येत आहे. नंदुरबार शहरातील मंगळ बाजार परिसरातील मुकेश मोची यांचा वडिलोपार्जित हा व्यवसाय असून जवळपास ५० वर्षापासून ढोल ताशांच्या व्यवसाय करीत आहेत. १ हजार पासून तर १० हजार पर्यंत ढोलची किंमत आहे तर २५० पासून २ हजारापर्यंत ताशांच्या किमती आहेत. ढोल ताशांचे नंदुरबार शहरात २ ते ३ व्यावसायिक आहेत अत्यल्प दरात वाजंत्री साहित्य उपलब्ध होत असल्याने गणेशोत्सवाच्या पहिलेच ८५ टक्के साहित्य विक्री झाल्याचे व्यावसायिक मुकेश मोची यांनी सांगितले. संपूर्ण जिल्ह्यात ८ ते १० दुकाने ढोल ताशांचे आहेत त्यात नंदुरबार शहरात दोन–तीन दुकान हे विक्री साठी प्रसिद्ध आहेत. या ढोल ताशांचा विक्रीतून लाखो रु. उलाढाल होताना दिसत आहे. एकंदरीत गणपती उत्सव जवळ येऊन ठेपला आहे त्यामुळे गणेश मंडळांकडून मोठ्या प्रमाणात ढोल ताशे खरेदी करण्यासाठी गर्दी होताना दिसत आहे.

### बुलडाणा जिल्हा होमगार्ड मैदानी चाचणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** :बुलडाणा जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी २०२४ करीता ऑनलाईन प्रणालीमधून अर्ज मागविण्यात आले होते. कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी करीता उमेदवारांनी नियोजित कालावधीमध्ये दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी बोलविण्यात आले होते. पावसामुळे ग्राऊंड सुस्थितीत नसल्यामुळे मैदानी चाचणी घेता आली नाही. दि. ३ सप्टेंबर रोजीचे उमेदवार यांना दि. ६ सप्टेबर २०२४ रोजी सकाळी ५.३० वाजता बोलविण्यात येत असून नमूद उमेदवारांनी मैदानी चाचणी करीता पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे हजर राहावे. मैदानी चाचणी आवेदन क्रमांक ८५५१ ते ११४०० ( महिला वगळून) मैदानी चाचणी दि. ६ सप्टेबर रोजी राहील. नियोजित वेळापत्रकातील दिनांकास पाऊस आल्यास वेळापत्रकात बदल करण्यात येईल . वेळापत्रकात बदल झाल्यास त्याची सचूना ाहरीरिहीर.gov. in/ mahahphg.logl.php या संकेत स्थळावर देण्यात येईल त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेत स्थळावरील सुचनांकरिता अद्यावत राहवे. असे आवाहन जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधिक्षक, बी.बी. महामुनी यांनी कळविले आहे.

### भाजपा आमदार नितेश राणे यांना अटक करा

#### मेहकर शहर कांग्रेस अल्पसंख्याक विभागाची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : स्थानिक मेहकर येथे आज दि ४ सप्टेंबर २०२४ रोजी मेहकर शहर कांग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या वतिने,मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार साहेब यांना निवेदन देण्यात आले,ज्यामध्ये नमुद करण्यात आले कि दि १ सप्टेंबर २०२४ रोजी एका कार्यक्रमामध्ये भारतीय जनता पार्टीचे आमदार नितेश राणे म्हटले कि,मुस्लीम समाजाच्या बांधवाना मस्जिदीमध्ये घुसुन मारु एव्हढेच नव्हे तर मुस्लीम समाजाने नितेश राणे यांचा विरोध केला तर त्यांची जिभ कापण्यात येईल अशाप्रकारचे बेताल वक्तव्य करुन दहशत निर्माण करण्याच काम नितेश राणे यानी केले असुन मुस्लीम समाजामध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे,त्यांच्यावर शासनाने गुन्हे दाखल करुन त्याना त्वरीत अटक करण्याची मागणी,मेहकर शहर कांग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या वतिने करण्यात आली.

निवेदनावर मेहकर शहर कांग्रेस अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष युनुस पटेल,ओबीसी जिल्हा सरचिटणिस शाहुभाई गवळी,युवक कांग्रेस शहर अध्यक्ष हाजी रियाज कुरेशी,असंघटित कामगार शहर अध्यक्ष छोटुभाई गवळी, युवा नेते जमील अहेमद, वसीम खान, हाजी आफताब कुरेशी, अलियार कुरेशी, मिनाज कुरेशी, राजिक बागवान, अनिस शेख,शेख शहेबाज, तौफिक गवळी, जुबेर कुरेशी, शहाद कुरेशी, नवेद कुरेशी, आदिल कुरेशी, आरीफ कुरेशी, शेख समीर आदि पदाधिकारी व कार्यकत्यांच्या सह्या आहेत.



### पत्नीला दिलेल्या शारीरीक मानसिक प्रकरणी

## आरोपी पतीस ३ वर्षे सश्रम कारावास व रूपये पाच हजार दंडाची शिक्षा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यातील मौजे अंबाशी ता. चिखली सौ. उज्वला संदीप जाधव वय– २८ वर्षे, हिला पती संदीप तेजराव जाधव याने सतत लग्नानंतर उज्वला संदीप जाधव हिस शारीरीक मानसिक त्रास देवुन हुन्डयांची मागणी केली व तिचे वडील भगवान विठोबा शिरसागर रा. पारडा तांगडे ता. मेहकर जि. बुलडाणा यांचेकडुन हॉटेल व्यवसाय करीता ३०,०००/– रु. घेतल्यानंतर सदरची रक्कम परत न करता ती रक्कम ३०,०००/– हुन्डयांमध्ये जमा केली आरोपी संदीप जाधव याने मयत उज्वला व तिचे आई वडीलाना सांगीतले, परंतु मयत उज्वला हिने तिचे आईवडीलांनी सदरची रक्कम बचत गटांकडुन व्याजाने घेतलेले असुन त्यांची रक्कम परत करा असे वारंवार पती आरोपी संदीप जाधव, सासु, सासरे, दिर व नंनद यांना विनंती केली. परंतु, त्यांनी रक्कम रू. ३०,०००/– हुन्डयांमध्ये जमा केले व परत न देण्याच्या कारणावरून सतत तिला शारीरीक मानसिक त्रास देणे सुरू केले. मयत उज्वला हिचे लग्न १३/०५/२०१७ रोजी झाले होते. त्यानंतर अंदाजे ६ महीन्याच्या कालावधी पासुन वरील आरोपी संदीप जाधव, त्याने हुंड्यासाठी त्रास दिला व त्या कारणास्तव मयत उज्वला हिने आरोपी संदीप जाधव व त्याचे भाउ, बहीण व आई याच्या त्रासाला कंटाळुन दिनांक. १९/०६/२०१९ रोजी गळफास घेवुन अंबाशी येथे रहात्या घरात आत्महत्या केली. सदर घटनेचा रीपोर्ट मयत हिचे वडील भगवान विठाबा क्षिरसागर रा. पारडा तांगड यानी वरील प्रमाणे पोलीस स्टेशन चिखली येथे दिल्यांनतर पोलीसांनी आरोपी संदीप जाधव, शांम जाधव, लताबाई जाधव व कविता इंगळे यांचे विरूध्द कलम ४९८–अ. ३०६, ३०४–ब, ३४ भा.द.वी नुसार गुन्हा नोंदविला व योग्य तो कायदेशीर तपास करून दोषारोप पत्र बुलडाणा येथील न्यायालयात दाखल केले. सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने १० साक्षीदार तपासण्यात आले, त्यामध्ये मयतचे वडील भगवान शिरसागर, लताबाई शिरसागर तसेच मयत उज्वला हिची काकु अंन्तकला शिरसागर व पुजा गवई रा. खैरव यांची साक्षी महत्वाची ठरली. त्यामुळे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, श्री. स्वप्नील सी. खटी साहेब यांनी आरोपी संदीप जाधव यास ३ वर्षे सश्रम कारावास व ५०००/– रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अश्या प्रकराची शिक्षा दि. ३१/०८/२०२४ रोजी सुनावली. सदर प्रकरणामध्ये सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. एस. पी हिवाळे बुलडाणा यांनी प्रभावी पणे सरकारची बाजु मांडुन आरोपीने केलेल्या गुन्हयाच्या बाबत तो कसा उज्वला हिये मरणास जवाबदार आहे, या बाबत प्रखर युक्तीवाद केला. त्यामुळे विद्यमान न्यायालयाने वरील आरोपी संदीप जाधव यास वरील प्रमाणे शिक्षा व दंड सुनावला. तसेच कोर्ट पैरवी पो. हे. कॉ. नंदाराम इंगळे ब. नं ६६७ चिखली यांनी सहकार्य केले.

